मागासवर्गीयांसाठी राखून ठेवलेली पदे तशीच पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:बीसीसी-१०८९/४६६३/प्र.क्र. ३५३/८९/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ ऑक्टोबर १९८९.

पहा:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७८/[ईसीआर]/जे, दिनांक ३८ मे १९७१.

## शासन निर्णय

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७८/[ईसीआर]/जे, दिनांक २८ मे १९७१ अन्वये सरळ सेवा प्रवेशाने भरती करतांना मागासवर्गीयांच्या एखाद्या विशिष्ट गटासाठी राखून ठेवलेल्या रिक्त पदांपैकी कोणतीही पदे, योग्य उमेदवारांच्या अभावी त्या गटातील उमेदवाराची नेमणूक करून भरता आली नाहीत तर, ती आरक्षित रिक्त पदे पाच भरती वर्षापर्यन्त पुढे नेऊन त्या त्या गटासाठी तशीच राखून ठेवावीत असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही नियुक्ती अधिका-यांकडून अशी आरक्षित पदे बिगर मागासवर्गीय उमेदवारांच्या नियुक्तीने भरण्यात आली आहेत. त्यामुळे मागासवर्गीयांचा अनुशेष भरून काढण्यासाठी सहजासहजी रिक्त पदे भरतीत उपलब्ध होत नाहीत. शासनाच्या आदेशाप्रमाणे मागासवर्गीयांची आरक्षित रिक्त पदे आरक्षण मुक्त करून बिगर मागासवर्गीयांच्या नियुक्तीने भरता येत नाहीत.

२. वरील आदेशांचा पुनरूच्चार करून शासन आता अशा सूचना देत आहे की, सरळ सेवा प्रवेशाने भरती करताना मागासवर्गीयांच्या एखाद्या विशिष्ट गटासाठी राखून ठेवलेल्या रिक्त पदांपैकी कोणतीही पदे पात्र उमेदवारांच्या अभावी त्या गटातील उमेदवारांची नेमणूक करून भरता आली नाहीत तर, ती रिक्त पदे पाच भरती वर्षापर्यन्त त्या गटासाठी तशीच राखून ठेवावीत. शासनाच्या पूर्व अनुमती शिवाय आरक्षित रिक्त पदे आरक्षण मुक्त करून भरण्यात आली आहेत असे आढळून आल्यास संबंधित नियुक्ती अधिका-यांविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

३. वरील आदेशांचे शासकीय, निम-शासकीय सेवा तसेच महामंडळे, मंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, अनुदानित संस्था, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम, विद्यापीठे, इत्यादीमधील सर्व नियुक्ती अधिका-यांनी काटेकोरपणे अनुपालन करावे व मागासवर्गीयांची आरक्षित पदे विहित बिंदू नामावली नुसार भरण्यात येतील याबाबत दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र.द. माळवी,
उप सचिव, महाराष्ट्र शासन. [कृ.मा.प.]

शामम्रु-रोटा-साप्रवि-एच-८८९[३,५००]

प्रति

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
x प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
x प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
x प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
x सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
संचालक, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सर्व जिल्हा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प,
सर्व जिल्हा सेवायोजन अधिकारी,
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील इतर सर्व विभाग प्रमुख/
कार्यालय प्रमुख.

x पत्राने.